नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०५/२०२६ (सोमवार )**

---

## अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, १० गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २४/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मोहाडी शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान संशयित महिन्द्रा बोलेरो पिकअप क्र. एम.एच ४० डी.सी. २८४३ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १० गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून महिन्द्रा बोलेरो पिकअप क्र. एम.एच ४० डी.सी.२८४३ किंमती ६,००,०००/—रूपये आणि १० गोवंश जनावरे किंमती १,००,०००/—रूपये असा एकुण ७,००,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी महिन्द्रा बोलेरो पिकअप क्र. एम.एच ४० डी.सी. २८४३ चा चालक व मालक आरोपी यांचेविरूद्ध कलम ११(१), (ड), (इ) (फ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६०, सहकलम ५, ५(अ), (१), ९, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## पोलीस ठाणे केळवद हद्दीतील तिष्टी खुर्द शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर २ गुन्हे नोंद,५६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद :—** दिनांक २४/०५/२०२६ रोजी केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील तिष्टी खुर्द शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग

यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांनी तिष्टी खुर्द शिवारात घटनास्थळावरील हातभट्टया नष्ट केल्या.

**कारवाई क्रं १)** महीला आरोपी हीचेवर कारवाई करत घटनास्थळावरून ६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि ०३ प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. **कारवाई क्रं २)** आरोपी नामे अविनाश पवार, वय ४५ वर्ष, रा. तिडंगी, ता. कळमेश्वर याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून ८०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि ०४ प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून दोन्ही कारवाईत पंचासमक्ष एकुण १४०० लिटर मोहाफुल सडवा, प्लास्टीक ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ५६,०००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी १ असे २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**



**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोलीस स्टेशन उमरेड :-** पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक २४/०५/२०२६ रोजी रात्री १०:०० ते ११:०० वाजताच्या सुमारास कावरापेठ येथे गोलू शेख यांच्या हबीबी पानठेल्या समोर फिर्यादी, राजकुमार पवार व शाहीद नसीम शेख हे मेकॅनिकल कामाबाबत बोलत उभे होते. त्यावेळी आरोपी सोहेल उर्फ जानी शाहीद शेख हा तेथे आला. मृतक राजकुमार पवार यांनी आरोपी यास "क्या रे जानी" असे म्हणत त्याचे मानेवर हात मारला असता आरोपीला राग आला. आरोपीने राजकुमार पवार यांच्यावर चाकुने वार करून गंभीररीत्या जखमी करून घटनास्थळावरून निघुन गेला. त्यानंतर जखमी **राजकुमार मारोती पवार वय ५० वर्षे, रा. शोभापुर कॉलनी, शक्ती नगर, पाताखेळी, ता. घोडा डोंगरी, जि बैतुल, राज्य मध्यप्रदेश** यांना सरकारी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांस तपासुन मृत घोषित केले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १०३(१) भा.न्या.सं.अन्वये नोंद आहे.

**आज दिनांक २५/०५/२०२६ रोजी यातील आरोपी सोहेल उर्फ जानी शाहीद शेख , वय २३ वर्षे, रा. कावरापेठ पाणी टाकी जवळ, उमरेड याला उमरेड येथुन अटक करण्यात आली आहे.**

# पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी अंतर्गत औद्योगिक क्षेत्रातील कंपनी परीसरातील गुन्हेगारी मध्ये घट व अवैध धंदयावर कारवाई मध्ये वाढ झाल्याबाबत...

दिनांक २५/०५/२०२६ रोजी एका वृत्तपत्रात बुटीबोरीत वाढल्या चोऱ्या ; औदयोगिक क्षेत्रात अवैध दारूविक्री, महीलांच्या सुरक्षेचाही प्रश्न अशा शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे. सदर बातमीबाबत सविस्तर माहीती अशी आहे की, दिनांक २२/०५/२०२६ बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात बी.एम.ए हॉल बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन एमआयडीसी, बुटीबोरी येथे पोलीस प्रशासन आणि बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यांच्या मध्ये समन्वय बैठक घेण्यात आली. सदर बैठकी मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग, सहायक पोलीस निरीक्षक श्री

प्रंशाात भोयर, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी आणि बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन चे पदाधिकारी आणि आदौगिक क्षेत्रातील व्यवसयीकांची उपस्थिती होती. सदर बैठकी मध्ये औद्योगिक क्षेत्रातील मुद्‌दंयाच्या अनुषंगाने एमआयडीसी बुटीबोरी येथे सुरक्षा उपाययोजना दृष्टीकोणातून एमआयडीसी प्रशासनाकडून सिसिटीव्ही कॅमेरे वाढविण्याबाबत, तसेच मुख्य रस्त्यांवर विद्युत दिवे लावण्याबाबत या संदर्भात पोलीस विभाग व एमआयडीसी अधिकाऱ्यांची संयुक्त बैढक घेण्याचे निर्देश कार्यकारी समितीला दिले आहे.

**पोलीस प्रशासनातर्फे नेहमी एमआयडीसी परिसरातील कंपन्यांना भेटी देऊन कंपनी प्रशासनासोबत बैठका घेण्यात येतात. याशिवाय श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर उपविभाग या दामिनी पथाकाचे अधिकारी आणि अंमलदार यांच्यासह एमआयडीसी परिसरात कार्यरत महिला कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांच्याशी संवाद साधतात. महीला कर्मचारी यांना त्यांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेले दामिनी पथक आणि महीलांबाबत हेल्पलाईन क्रं १०९० तसेच १८१ आणि डायल ११२ बाबत माहीती देण्यात येते. तसेच एमआयडीसी परीसरातील बंद कंपनीतील चोरीच्या घटनाबाबत तसेच अवैध दारूविकी बाबत केलेल्या कारवाईचा तुलमात्मक आढावा ठेवण्यात आला असून सध्या मे सन २०२५ च्या तुलनेत मे सन २०२६ मध्ये औद्योगिक क्षेत्रीतील कंपनीतील चोरी च्या गुन्हयांमध्ये ५० टक्कयांनी घट झाली असून गुन्हे उघडकीस आल्याचे प्रमाण १०० टक्के आहे. अवैध दारू गुन्हयांच्या कारवाई ३ टक्कयांनी वाढल्या असुन अवैध अंमली पदार्थाच्या कारवाईत १५ टक्कयांनी वाढ झालेली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ५१ हजार ६०० रूपयाचा मुद्‌देमाल जप्त, पोलीस स्टेशन कुही यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २४/०५/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा आकोली शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान हिरो होंन्डा पॅशन मोटरसायकल एम

एच ४०/एक्स— ६४२७ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता विदेशी दारू (बिअर) मिळुन आली. **आरोपी नामे १) विवेककुमार चुन्नीलाल प्रजापती, वय २४ वर्ष, २) उपेंन्द्रकुमार सुखदेव रजवार, वय २८ वर्ष, दोन्ही रा. कुजकीरो, पोस्ट. कुंजकिरो वार्ड क्र. ०७, बांडटोला, जि. बोकारो झारखंड, ह. मु. भगवान कोडे, रा. चनोडा यांच्या शेतात, ता. कुही हे अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष १) Tuborg Strong कंपनीच्या विदेशी दारूच्या ०८ निपा किंमती १६००/—रूपये आणि हिरो होंन्डा पॅशन मोटरसायकल एम एच ४०/एक्स— ६४२७ किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५१,६००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपी **१) विवेककुमार चुन्नीलाल प्रजापती, वय २४ वर्ष, २) उपेंन्द्रकुमार सुखदेव रजवार, वय २८ वर्ष, दोन्ही रा. कुजकीरो, पोस्ट. कुंजकिरो वार्ड क्र. ०७ए बांडटोला, जि. बोकारो झारखंड, हण मु. भगवान कोडेए रा. चनोडा यांच्या शेतात, ता. कुही याचेवि**रूध्द पोलीस स्टेशन कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने